दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज
# रायगड नगरी
मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार
www.raigadnagari.com
/ raigadnagari

दैनिक रायगड नगरी
जाहिरातीचे उत्तम माध्यम
या वृत्तपत्रात व्यावसायिक, शैक्षणिक जाहिराती तसेच वारस दाखला, नावात बदल, मिळकत खरेदी-विक्री, सहकारी संस्था, तसेच बक्षिसपत्र बाबतच्या नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क करा.
Publish Your Public Notice, Tender Notice,
Property, Missing Documents, Change of Name ads. in 'Dainik Raigad Nagari'
For Booking....
Call / Whatsapp : 9619737911 / 9619979706
Off : 12, Radha Hari Niwas Complex, Opp.old Ratan talkies, Tilak Road, Panvel. Ph : 022-27469434
Web : www.raigadnagari.com / Email : raigad.nagari@gmail.com

वर्ष २० वे | अंक २४९ | MAHMAR/2006/17212 | रायगड | शनिवार, दि.६ डिसेंबर २०२५ | किंमत १ ₹ | पृष्ठे ४ | रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित

### नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला पनवेलची थेट जोड

# फुलपाखराच्या आकाराचा विना-सिग्नल उड्डाणपूल



**दै.रायगड नगरी । नवी मुंबई**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सुरू होण्याच्या पार्श्वभूमीवर पनवेल परिसरातील दळणवळणाला नवे रूप देणारे प्रकल्प वेगाने पूर्णत्वाकडे जात आहेत. विमानतळाच्या पूर्व प्रवेशद्वारासाठी तयार होणारा ईस्टर्न एंट्री इंटरचेंज 'क्लोअर लीप' हा महत्त्वाचा प्रकल्प अंतिम टप्प्यात पोहोचला असून पुढील सहा महिन्यांत तो सुरू होण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या ८०० कोटी रुपयांच्या निधीतून महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (एमएसआरडीसी) हे काम करत आहे. पनवेल शहर, खांदेश्वर रेल्वे स्थानक परिसर आणि जेएनपीटी बंदरातून येणारी कंटेनर वाहतूक लक्षात घेऊन फुलपाखराच्या आकाराचा विना-सिग्नल उड्डाणपूल व जोडरस्त्यांचे जाळे तयार केले जात आहे. या उड्डाणपुलाद्वारे गाढी नदीवरील खाडीमार्ग ओलांडून कंटेनर थेट विमानतळाच्या कार्गो प्रवेशद्वारापर्यंत पोहोचू शकतील, अशी या मार्गाची रचना करण्यात आली आहे.

याच धर्तीवर विमानतळाच्या उलवा बाजूस वेस्टर्न एंट्री इंटरचेंज या प्रकल्पाचे कामही सुरू आहे. या इंटरचेंजमुळे अटलसेतूवरून मुंबईच्या दिशेने आलेल्या वाहनांना थेट विमानतळ गाठता येईल. हे दोन्ही इंटरचेंजचे प्रकल्प आखणी केलेल्या वेळेत पूर्ण करण्यासाठी सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल आणि सहव्यवस्थापकीय संचालक शांतनू गोयल हे सातत्याने यंत्रणेकडे पाठपुरावा करीत आहेत. उड्डाणपुल, गोलाकार चौक व उंच मार्गांच्या जाळ्यामुळे नवी मुंबई व पनवेलचा विमानतळाशी अखंडित संपर्क साधला जाईल, ही पायाभूत सुविधा शहराच्या विकासाला मोठी गती देणारी ठरणार आहे. या प्रकल्पामुळे पनवेल शहरातील वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणात कमी होणार असून शीव-पनवेल महामार्ग, मुंबई-गोवा महामार्ग आणि अटलसेतू-पामबीच मार्गावरून येणाऱ्या प्रवाशांना विमानतळापर्यंत थेट पोहचता येईल. कळंबोली सर्कल, खांदेश्वर, तसेच पनवेल शहर या परिसरातील वाहनचालकांना या मार्गाचा सर्वाधिक लाभ मिळू शकेल.

# उरण ते नेरुळ, उरण ते बेलापूर रेल्वे फेऱ्यामध्ये वाढ

**दै.रायगड नगरी । विठ्ठल ममताबादे**

**उरण ।** गेली अनेक दिवसापासून उरण ते नेरुळ व उरण ते बेलापूर या मार्गांवर रेल्वेच्या फेऱ्या वाढविण्यात यावेत अशी मागणी प्रवाशी वर्ग, नागरिक, ग्रामस्थ तसेच विविध सामाजिक संस्था सामाजिक संघटनानीं केली होती. त्या मागणीला आता यश आले आहे. रेल्वेच्या फेऱ्या वाढविण्यात यावेत यासाठी आमदार महेश बालदी, भाजपचे युवा नेते प्रितम म्हात्रे यांनी पाठपुरावा, पत्रव्यवहार केला होता. त्यांच्या पाठपुराव्याला, पत्रव्यवहाराला आता यश आले आहे.या निर्णयामुळे आता प्रवाशी वर्गांना खूप मोठा दिलासा मिळाला आहे. उरण ते नेरुळ व उरण ते बेलापूर या मार्गावर पहाटे ५ वाजल्यापासून रेल्वे सुरु करण्यात यावे व नेरुळ व बेलापूर येथून उरणला येण्यासाठी शेवटची रेल्वे रात्री ११ वाजताची असावी अशी मागणी प्रवाशी वर्गांनी केली आहे.




महाराष्ट्राच्या प्रगत आणि सर्वसमावेशक विकासासाठी सतत प्रयत्न करणारे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या पाठपुराव्यानंतर माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदीजी आणि केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णवजी यांनी नेरुळ-उरण-नेरुळ (४ फेऱ्या), बेलापूर-उरण-बेलापूर (६ फेऱ्या) या अतिरिक्त लोकल सेवा सुरू करण्यास मंजुरी दिली आहे.तसेच तरघर आणि गव्हाण येथे नवीन रेल्वे स्टेशन स्थापन करण्यास मान्यता दिली आहे.या निर्णयामुळेमुंबई नवी मुंबई, रायगड जिल्ह्यातील वाहतूक व्यवस्थेला नवे बळ मिळणार आहे.

# १२ व्या राज्यस्तरीय 'अटल करंडक' एकांकिका स्पर्धेच्या महाअंतिम फेरीला शानदार सुरुवात

### सुप्रसिद्ध अभिनेते डॉ. गिरीश ओक, सुनील तावडे आणि प्रतिमा कुलकर्णी यांच्या हस्ते सोहळ्याचे उद्घाटन



**दै.रायगड नगरी । पनवेल**

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पुरस्कृत आणि अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखा व चांगू काना ठाकूर महाविद्यालय (स्वायत्त) यांच्या संयुक्त विद्यमाने दरवर्षी प्रमाणे यंदाही आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय 'अटल करंडक' एकांकिका स्पर्धेच्या अंतिम फेरी सोहळ्याचे उद्घाटन पनवेलमधील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात सुप्रसिद्ध अभिनेते गिरीश ओक, सुप्रसिद्ध दिग्दर्शिका प्रतिमा कुलकर्णी, सुप्रसिद्ध अभिनेते सुनील तावडे यांच्या हस्ते आज (दि. ०५) शानदारपणे झाले. तीन दिवस चालणाऱ्या या महाअंतिम फेरीत राज्यभरातून १०० हुन अधिक एकांकिकांमधून निवड झालेल्या उत्कृष्ट २५ एकांकिका सादर होणार असून नाट्य रसिकांना मोठी मेजवानी मिळाली असून विशेष म्हणजे या सोहळ्याला युवा ते ज्येष्ठ नाट्य रसिकांची मोठी गर्दी पहायला मिळाली.

१२ व्या पर्वाच्या या सोहळयाच्या प्रारंभाला प्रमुख मान्यवर म्हणून अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखा उपाध्यक्ष व स्पर्धा प्रमुख आणि पनवेल महानगरपालिकेचे माजी सभागृहनेते परेश ठाकूर, भाजपचे उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, माजी शहर अध्यक्ष जयंत पगडे, माजी नगरसेवक अनिल भगत, अजय बहिरा, राजू सोनी, महिला मोर्चाच्या शहर अध्यक्षा रुचिता लोंढे, माजी नगरसेविका दर्शना भोईर, सुरेखा मोहोकर, प्रीती जॉर्ज, सुरेखा कल्याणकर, नलिनी शेलार, सिद्धीका पुंजानी, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष आनंद ढवळे, सुप्रसिद्ध अभिनेता भरत सा-वले, अभिनेते व दिग्दर्शक राजा अत्रे, सीकेटी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. के. पाटील, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे संचालक संजय भगत, शहर सरचिटणीस अमित ओझे, प्रीतम म्हात्रे, रुपेश नागवेकर, जिल्हा उपाध्यक्ष मयुरेश नेतकर, संजय जैन, पवन सोनी, पनवेल शहर युवा मोर्चाचे शहराध्यक्ष हिमेश बहिरा, आरती तायडे, मनिषा बहिरा तसेच कार्यवाह श्यामनाथ पुंडे, सांस्कृतिक सेलचे जिल्हाध्यक्ष अभिषेक पटवर्धन, चिन्मय समेळ, अमोल खेर, गणेश जगताप, वैभव बुवा आदी उपस्थित होते.

महाअंतिम फेरीच्या पहिल्या दिवशी वसंतराव नाईक विज्ञान संस्था नागपूरची एकांकिका 'वि. प्र', मुलुंड वाणिज्य विद्यालय 'स्वातंत्र्य सौभाग्य', मिथक मुंबईची 'कारण काय', एकदम कडक नाट्य संस्था भाईंदरची ' बकेट लिस्ट',, वि. ग. वझे विद्यालय मुलुंडची 'द गर्दभ', आर्टस कॉमर्स अँन्ड सायन्स कॉलेज साताराचे 'सोयरीक', नाट्य स्पर्श आणि भवन्स महाविद्यालय अंधेरीची 'प्रतीक्षायान', राजाराम बापू अभियांत्रिकी महाविद्यालय इस्लामपूरची 'हाफ वे', कलादर्पण पनवेलची 'आख्यान- ए - झुरळ', आणि रेवन एंटरटेनमेंट पुणेची 'सांग रहियो' या दहा एकांकिकांचे सादरीकरण होते. उर्वरित १५ एकांकिका शनिवार व रविवारी सादर होणार आहेत. स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ ०७ डिसेंबर रोजी होणार असून स्पर्धेतील विजेत्या एकांकिकेला ०१ लाख रूपये आणि मानाचा 'अटल करंडक' देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात येणार आहे. तसेच ज्येष्ठ रंगकर्मी नीना कुलकर्णी आणि सुप्रसिद्ध अभिनेते व निर्माता सुनिल बर्वे यांचा गौरव रंगभूमीचा पुरस्काराने सन्मान करण्यात येणार आहे.

> महाराष्ट्रात नाटय चळवळ एक मोठी परंपरा आहे. नाट्य क्षेत्रातून कलाकार घडत असतात. त्या अनुषंगाने हि परंपरा कायम रहावी आणि नवोदित कलाकारांना व्यासपीठ मिळावा, त्यांनी आपल्या अंगी असलेले कौशल्य सादर करून या क्षेत्रात उज्वल कामगिरी करावी हा कायम उद्देश अटल करंडकचा राहिला आहे. ही स्पर्धा जरी डिसेंबर महिन्यात होत असली तरी तयारी मात्र मे महिन्यापासून सुरु होत असते. तपशीलवार चर्चा आणि ज्येष्ठांचे मार्गदर्शन घेऊन नियोजन केले जाते. हे करंडक सर्वांच्या सहकार्य आणि मेहनतीने यशस्वी होत असते, त्यामुळे दमदारपणे १२ व्या पर्वात पाऊल टाकले आहे. सांस्कृतिक क्षेत्राची पनवेलची पाळेमुळे घट्ट आहेत आणि ती अधिक वृद्धिंगत व्हावा, यासाठी नेहमीच प्रयत्नशील राहणार आहोत.
>
> **- परेश ठाकूर- अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखा उपाध्यक्ष व स्पर्धा प्रमुख**

### उसर येथील प्रकल्पाला ब्रेक

# अवघड वाहतूक बंदीचा गेल इंडिया कंपनीला फटका

### कोट्यवधींची मशिनरी महिनाभर रस्त्यावर धूळ खात!



**दै.रायगड नगरी । रत्नाकर पाटील**

**अलिबाग ।** औद्योगिक जिल्हा असलेल्या रायगड जिल्ह्यातील अलिबाग तालुक्यांतील उसर येथे होत असलेल्या भारत सरकारची अंगीकृत कंपनी असलेल्या गेल (इंडिया) कंपनीच्या माध्यमातून तब्बल ११ हजार २५६ कोटी रुपये गुंतवणूक केली आहे. याठिकाणी नविन पीडीएच-पीपी प्रकल्पाच्या उभारणीचे काम सुरु आहे. पण गेल्या एक महीन्यांपासून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सुस्त कारभारामुळे हे काम पूर्णपणे ठप्प झाले आहे.

गेल्या ३ नोव्हेंबर २०२५ रोजी अलिबाग-उसर रस्त्यावरील वढाव आणि वेलवली या दोन गावाच्यामध्ये असलेला सार्वजनिक बांधकाम विभागाचा छोटा पुल कोसळला. वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली आहे. पुलाला पर्यायी व्यवस्था गेल्या महिनाभरापासून केलेली नाही. परिणामी गेल इंडियाच्या उसर येथील प्रकल्पासाठी येणारी परदेशी मशिनरी घेवून येणारी सर्व अवजड वाहनांची वाहतुक पूर्णपणे ठप्प झालेली आहे. कोट्यावधी रुपये किमतीची मशिनरी घेवून येणारी ही अवजड वाहने तळोजा, जेएनपीए, पनवेल, पेण येथे रस्त्याच्या बाजूला गेला महिनाभर धूळ खात उभी आहेत.

गेल कंपनीचे प्रशासन अधिकारी व संबंधित ठेकेदारांकडून अलिबाग येथील सार्वजनिक बांधकाम विभागाकडे या पुलाचे नविन बांधकाम लवकरात लवकर सुरु करण्याबाबत पाठपुरावा करण्यात येत आहे. मात्र अलिबाग सार्वजनिक बांधकाम विभागाने एक महिना झाला तरी अद्याप पर्यंत या कोसळलेल्या पुलाच्या नविन बांधकामाची सुरवात देखील केलेली नाही.

गेल इंडिया कंपनीच्या नविन प्रकल्पाच्या उभारणीकरिता आवश्यक असणारी देश-विदेशातून आलेली उपकरणे घेऊन आलेली अवजड वाहने अलिबागच्या अलिकडे उपलब्ध असलेल्या मोकळ्या जागेत उभी करण्यात आलेली आहेत. यामुळे प्रकल्प उभारणीचे मोठ्याप्रमाणात आर्थिक नुकसान होत आहे. त्याचप्रमाणे ही उपकरणे वाहतुक करणारी अवजड वाहने गेल कंपनीचे उसर येथिल नविन प्रकल्पापर्यंत पोहचू न शकल्यामुळे याचा परिणाम प्रकल्प उभारणीच्या कामावर व संबंधित ठेकदारांकडे काम करत असलेल्या लोकांच्या रोजगारावर होण्याची मोठी शक्यता निर्माण झाली आहे. दरम्यान अलिबाग-उसर रस्त्यावरील वढाव आणि वेलवली या दोन गावाच्यामध्ये असलेला अलिबाग सार्वजनीक बांधकाम विभागाचा पूल नव्याने बांधण्याकरिता प्रस्ताव सावर्जनीक बांधकाम विभागाच्या माध्यमातून राज्य शासनाकडे मंजूरी करिता पाठविला आहे. लवकरच मंजूरी होवून पूलाचे काम सुरु होणे अपेक्षीत आहे. अशी माहिती रायगड जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण चे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा निवासीउप जिल्हाधिकारी संदेश शिर्के यांनी दिली.

# राजकीय नेत्याला मारहाण तर परस्परांविरोधात कर्जत पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल

**दै.रायगड नगरी । संजय गायकवाड**

**कर्जत ।** कर्जत नगरपरिषदेच्या सार्वत्रिक निवडणूकीचे दि. २ डिसेंबर रोजीच्या मतदानाच्या दिवशी झालेल्या वादातून व झालेला वाद त्या दिवशी मिटला असताना, दुसऱ्या दिवशी पुन्हा हा वाद झाल्याने एका बडया नेत्याकडून एका रहिवाशाला मारहाण तर रहिवाशाकडून बडया नेत्याला मारहाण झाल्याची घटना कर्जत मधील बुध्दनगर येथे घडली आहे. या वादात बडया नेत्याच्या कार्यकर्त्याकडून रहिवाशाची मोटार सायकल फोडल्याची घटना घडली असुन, या मारहाणीच्या घटने संदर्भात कर्जत पोलीस ठाण्यात बडा नेता व रहिवाशी या दोघांच्या विरोधात गुन्हा दाखल झाला आहे. तर बडया नेत्यानी रहिवाशाच्या विरोधात ट्रॉसिटीचा गुन्हा देखील दाखल करण्यात केला आहे.

कर्जत नगरपरिषदेच्या सार्वत्रिक निवडणूकीमध्ये आर पी आय रामदास आठवले पक्षाचे कोकण प्रदेश कार्यध्यक्ष राहुल डाळिंबकर यांची सुनबाई आम्रपाली अलोक डाळिंबकर या प्रभाग क्र. ४ अ मधून महायुतीच्या उमेदवार म्हणून धनुष्यबाण ही निशाणी घेऊन निवडणूक रिंगणात उतरल्या होत्या. तर दि. २ डिसेंबर रोजी झालेल्या मतदान दरम्यान त्यांचा विरोधकां बरोबर किरकोळ वाद झाला होता. व तो वाद हा तेव्हाच मिटवण्यात आला होता. मात्र दुसऱ्या दिवशी दि. ३ डिसेंबर रोजी दुपारी साधारण १.४५ वाजण्याचे सुमारास बुध्दनगर कर्जत येथील समाज मंदिरामध्ये वाचनालयाच्या शेजारी बसलेले राकेश अशोक नागदेव, वय. ३८ वर्ष यांना आर पी आय रामदास आठवले पक्षाचे कोकण प्रदेश कार्यध्यक्ष राहूल डाळींबकर व अलोक राहूल डाळींबकर यांच्यात झालेल्या निवडणूकाच्या वादातून हाणामारीची घटना घडली आहे. या मध्ये राहूल डाळींबकर यांना राकेश अशोक नागदेव यांनी खाली श्रीमुखात लगावत खाली पाडून मारहाण करत जातीवाचक शिवीगाळ करत, हातामध्ये चोपर घेऊन अंगावर धाऊन जिवे मारण्यासाठी अल्याचा व ट्रॉसिटीचा गुन्हा हा आर पी आय रामदास आठवले पक्षाचे कोकण प्रदेश कार्यध्यक्ष राहूल डाळींबकर यांनी राकेश अशोक नागदेव यांच्या विरोधात कर्जत पोलीस ठाण्यात दाखल केला आहे.

तर राकेश अशोक नागदेव यांनी राहूल डाळींबकर व अल-ोक राहूल डाळींबकर असे दोघांनी मला काल काय झाले असे विचारत, तुला गावात राहू देणार नाही अशी धमकी देत गळपट्टी पकडून श्रीमुखात मारत. झालेल्या दोघांमधील तेथे वादात अलोक डाळींबकर याने त्याच्या हातातील लाकडी दांडक्याने माझ्या हातावर फटका मारला. व अजय उर्फ राजू डाळींबकर, सिध्दांत डाळींबकर यांनी देखील मला हाताबुक्याने मारहाण केली. तसेच त्यांच्याचपैकी कोणीतरी माझ्याकडील माझी बुलेट मोटार सायकल क्रमांक. एम एच -०५ - सी आर- २६८९ या मोटार सायकलवर देखील लाकडी दांडक्याने व दगडाने फटके मारुन मोटार सायकलची मोडतोड तसेच आमच्या दोघांमध्ये झालेल्या झटापटीमध्ये त्या दोघांनी अंगातील टी शर्ट फाडत गळ्यामध्ये असणारी दोन तोळ्याची सोन्याची चेन या भांडणामध्ये तुटून पडून गहाळ झाली असून सदरची सोन्याची चेन अजूनपर्यन्त भेटलेली नसल्याची तक्रार केली आहे. राहूल प्रल्हाद डाळीबकर, अलोक राहूल डाळींबकर, अजय उर्फ राजू डाळींबकर, सिध्दांत राहुल डाळींबकर यांच्या विरोधात कर्जत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. तर राकेश अशोक नागदेव यांना काल पनवेल जिल्हासत्र न्यायालयत कर्जत पोलीसांनी हजर केले असता, राकेश अशोक नागदेव यांना न्यायालयानी दोन दिवसाची पोलीस कस्टडी सुनाविण्यात आली आहे.



# नव्वदीचा रुपया काय म्हणतो?

रुपयाने डॉलर्सच्या तुलनेत नव्वदी पार केल्यानंतर दोन महत्त्वाच्या गोष्टी समोर आल्या. पहिली-आशिया खंडातील सर्वांत कमकुवत चलन अशी नामुष्की रुपयावर ओढवली. दुसरी-मुख्य आर्थिक सल्लागार व्ही. अनंत नागेश्वरन आणि पंतप्रधानांच्या आर्थिक सल्लागार परिषदचे अंशकालीन सदस्य नीलेश शाह म्हणतात की, चलनाची ही घसरण सरकारसाठी चिंतेची बाब नाही. ही सामान्य बाब आहे. या दोन्हींचा एकत्रित विचार करता दिसते की, राजकीय टीका टाळण्यासाठी सरकार स्थिती सामान्य आहे असे दाखविण्याचा प्रयत्न करीत आहे. डॉलर्स बलवान झाल्यामुळे निर्यातीमधून अधिक परकीय चलन मिळेल, वगैरे फायदेही सोयीस्करीत्या सांगितले जात आहेत. प्रत्यक्षात ही चिंतेची बाब आहेच. कारण, प्रगत देशांच्या तुलनेत भारताचा विकासदर वेगाने वाढत आहे, पायाभूत सोयीसुविधांची उभारणी होत आहे, देश प्रगतीच्या वाटेवर अग्रेसर आहे, असे चित्र उभे केले जात असताना देशाच्या चलनाचे मूल्य मात्र दिवसेंदिवस घसरत असेल तर हा विरोधाभास अगदी सामान्यांच्याही लक्षात येण्याजोगा आहे. निर्यातीला फायदा, पर्यटन व्यवसायाला चालना वगैरे फायदे समाजातील एका विशिष्ट वर्गांना मिळतात आणि रुपयाच्या घसरगुंडीचा तोटा मात्र सर्वसामान्यांना होतो, हा या विरोधाभासातील महत्त्वाचा फरक आहे. आपला देश इंधनांपासून खाद्यतेलापर्यंत आणि सोने-चांदीपासून इलेक्ट्रॉनिक वस्तू व इलेक्ट्रिक-इलेक्ट्रॉनिक उत्पादनासाठी कच्चा मालासाठी आयातीवर अवलंबून आहे. रुपया घसरला की या आयातीसाठी अधिक पैसे मोजावे लागतात. साहजिकच हा आयात माल सर्वसामान्यांपर्यंत पोहोचतो तेव्हा त्याचे दर वाढलेले असतात. रुपयाच्या घसरणीचा पहिला परिणाम असतो अधिक महागाई. त्याशिवाय, परदेशात दर्जेदार शिक्षण घेण्याची कनिष्ठ मध्यमवर्गीयांच्या मुला-मुलींची स्वप्ने रुपया-डॉलर्सच्या विनिमय दरावर अवलंबून असतात. याशिवाय महत्त्वाचे हे की, चलनाचे अवमूल्यन हा केवळ आर्थिक व्यवहार नसतो. देशाची सर्वच क्षेत्रातील धोरणे, विशेषत: राजकीय स्थैर्य, शांतता, कायदा-सुव्यवस्था, त्यामुळे आकर्षित होणारी विदेशी म्हणजे डॉलर्स किंवा युरो-पौंडामधील गुंतवणूक, त्यातून होणारी रोजगार निर्मिती, या सगळ्यांचे सामाजिक-आर्थिक परिणाम अशा विविधांगी कारणांनी त्या त्या देशाच्या चलनाची वृद्धी किंवा अवमूल्यन होते. याशिवाय अमेरिकेतील गुंतवणुकीवर अधिक व्याज मिळत असेल आणि भारतातील गुंतवणूक पुरेशा प्रमाणात सुरक्षित नसेल तर गुंतवणूकदार भारतीय बाजारातून पैसे काढून घेतात. हेदेखील रुपयाच्या घसरणीचे एक महत्त्वाचे कारण आहे. अमेरिकेने भारतीय मालावर लावलेले दामदुप्पट टॅरिफ आणि रखडलेला भारत-अमेरिका व्यापार करार, ही रुपयाच्या घसरणीची ताजी कारणे आहेत. सोबतच सरकारचा आर्थिक विषयांवर धरसोड वृत्ती, निर्णयांमधील गोंधळ किंवा निर्नायकी, वित्तीय बेशिस्त ही कारणे असतातच. हे असे एकाहून अधिक मुद्दे रुपयाच्या स्थितीसाठी कारणीभूत असल्याने संयुक्त पुरोगामी सरकार सत्तेवर असताना तेव्हाचा विरोधी म्हणजे आताचा सत्ताधारी पक्ष रुपयाची किंमत घसरणे म्हणजे सरकारची पत घसरणे आहे अशी टीका करीत होता. जनतेलाही ते पटत होते. भाजपचे सरकार सत्तेवर आले तेव्हा साधारणपणे डॉलरच्या तुलनेत साठ रुपये असा दर असलेला रुपया आता ९० च्या पुढे गेल्यानंतर साहजिकच काँग्रेस तसेच अन्य विरोधी पक्ष पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची याविषयीची जुनी भाषणे सोशल मीडियावर टाकून टीका करीत आहेत. संपुआ सत्ताकाळात रुपया 'सीनिअर सिटिझन' असेल तर तो आता 'सुपर सीनिअर सिटिझन' झाला, हा या टीकेचा सूर आहे. यातील राजकारण बाजूला ठेवले तरी रुपयाची घसरण थांबविण्यासाठी किंबहुना तो मजबूत करण्यासाठी काही दीर्घकालीन उपाय योजने गरजेचे आहेत. रुपया नव्वदीपार गेल्यामुळे सरकारची झोप उडाली नसल्याचे सांगितले जात असले तरी प्रत्यक्षात ती उडायला हवी. कारण, महागाईने कंबरडे मोडलेल्या सामान्यांना केवळ घोषणा आणि त्यांच्या प्रचाराने दिलासा मिळत नाही. मागच्या सरकारांना दोष देऊन आताच्या सरकारच्या उणिवा लपून राहत नाहीत. वित्तीय शिस्त, औद्योगिक उत्पादनावर भर, तेलाच्या निर्यातीला पर्याय अशा उपाययोजना करून ही घसरण थांबवायला हवी. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे सामाजिक व धार्मिक सौहार्द, सीमेवर व सीमेच्या आत शांतता यावरही लक्ष द्यायला हवे. जेणेकरून गुंतवणूकदारांचा देशाच्या अर्थव्यवस्थेवर विश्वास वाढेल. रुपया बलवान होईल. सरकारची पत वाढेल.

# शाळाबाह्य मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न करणार : आदेश डफळ

**दै.रायगड नगरी । राजीव नेवासेकर**

**कोर्लई ।** उदरनिर्वाहासाठी स्थलांतर करणा-या कुटुंबातील,अनियमित, शाळाबाह्य मुलांना शंभर टक्के शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे प्रतिपादन मुरुडमध्ये तहसील कार्यालयात आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत तहसीलदार आदेश डफळ यांनी केले.



शासनाच्या समग्र शिक्षा अभियानांतर्गत स्थलांतरित होऊन आलेल्या मुलांना शाळेत दाखल करुन घेऊन गुणवत्ता पूर्ण शिक्षण देण्याबाबत व स्थलांतरित होऊन जाणा-या मुलांचे नियोजन करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या तालुकास्तरीय समितीच्या बैठकीला यावेळी समिती अध्यक्ष तथा तहसीलदार आदेश डफळ, पंचायत समिती गटशिक्षणाधिकारी सुनील गवळी, सुनील पाटील,विश्वनाथ म्हात्रे ,चुनेकर, शिंदे,चेतन पाटील,राजेश भोईर, संतोष पुकळे,मिलिंद पालवणकर उपस्थित होते.

शाळाबाह्य, अनियमित व स्थलांतरित मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी व त्यांचे आरोग्य मान सुधारण्यासाठी एक विशेष मोहीम राबविण्यात येत असून शाळाबाह्य मुलांना कोणतीही उणीव असेल तर स्वतः वैयक्तिक मदत करेन असे तहसीलदार आदेश डफळ यांनी सांगितले.ज्या विद्यार्थ्यांचे आधार कार्ड बाकी आहेत, त्यासाठी सहकार्य करण्यात येईल,अशा मुलांना शिक्षण प्रवाहात आणणे, शैक्षणिक सुविधा पुरविणे आणि आरोग्याची जोपासना करणे हे काम प्राधान्याने करण्यात बैठकीत ठरविण्यात आले.प्रास्ताविक सुनील गवळी यांनी तर सुनील पाटील यांनी आभार मानले.

# कशेणे गावातील रहिवाश्यांची घरे होणार अधिकृत ; भाजपा-महायुतीचे निलेश थोरे यांचा पुढाकार

**दै.रायगड नगरी । माणगाव**

माणगाव तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत तळाशेत मधील कशेणे गावातील अनेक रहिवाश्यांची घरे ही वर्षानुवर्षे गुरुचरण मध्ये असल्याने शासकीय कार्यालयीन कामगाजामध्ये त्यांना अनेक अडचणी येत होत्या.गेली अनेक वर्षे संबंधित नागरिक हे आपल्याच मालकीची घरे असूनही दडपणाखाली होते. परंतु महाराष्ट्रामध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वामध्ये भाजपा महायुती सरकार आल्यानंतर भाजपाचे नेते व राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सर्वांसाठी घरे हा उपक्रम चालू करून ज्या नागरिकांची ३१ डिसेंबर २०११ पूर्वीची शासकीय जमिनीमध्ये निवासी घरे आहेत अशांना मोठा दिलासा देऊन ती घरे नियमानुकूल करून देण्याचा शासकीय अध्यादेश काढला आहे.याच धर्तीवर माणगाव तालुक्यातील तळाशेत जिल्हा परिषद मतदारसंघातील कशेणे गावच्या अनेक ग्रामस्थांची घरे ही सरकारी गुरचरण मध्ये असल्याने ती नियमित करण्यासाठी भाजपाचे युवक जिल्हाध्यक्ष व महायुतीचे युवानेते निलेश



थोरे यांनी देवेंद्र मुंढे यांच्यासमवेत पुढाकार घेतला असून त्यांनी सर्व लाभार्थी ग्रामस्थ्यांसमवेत उपविभागीय अधिकारी डॉ.संदीपान सानप,नायब तहसीलदार विपुल ढुमे,माणगाव पंचायत समितीच्या बी.डी. ओ शुभदा पाटील कुलकर्णी,अतिरिक्त बी.डी.ओ.श्री.जाधव,भूमीअभिलेख कार्यालयाचे अधिकारी संजय जावरे,तळाशेत ग्रामपंचायत प्रशासक श्री.गोल्हार या सर्व अधिकाऱ्यांची भेट घेऊन सदरील ग्रामस्थांची घरे ही शासकीय अध्यादेशानुसार नियमित करून द्यावी ही मागणी केली आहे.

यावेळी प्रांतधिकारी डॉ.संदीपान सानप यांनी उपस्थितांकडून पूर्ण माहिती घेऊन तात्काळ बिडीओंना प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत.यामुळे सर्व घरधारकांना मोठा दिलासा मिळणार असून युवानेते निलेश थोरे यांच्या भूमिकेमुळे वर्षानुवर्षे प्रलंबित असलेला प्रश्न सुटणार असून नागरिकांना मोठा दिलासा मिळणार असल्याचे देवेंद्र मुंढे यांनी सांगितले आहे. दरम्यान सदरील प्रकरणामध्ये आपण शेवटपर्यंत पाठपुरावा करणार असून महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी घेतलेल्या लोककल्याणकारी निर्णयाचा फायदा व महायुती सरकारच्या सर्वच योजनांचा लाभ हा समाजातील तळागाळा-तील सर्व घटकांना मिळवून देण्यासाठी आम्ही कटीबद्ध असल्याचे सांगितले. सदर प्रकरणी गरज भासल्यास चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट घेऊन ग्रामस्थांना सहकार्य करणार असल्याचे निलेश थोरे यांनी सांगितले.

# चार चाकी कारची मोटरसायकलला धडक, तरुणाचा मृत्यू

**दै.रायगड नगरी । पनवेल**

चार चाकी वाहनाने भरधाव वेगाने येऊन टीव्हीएस ज्युपिटरला धडक दिली. झालेल्या अपघातात प्रमोद प्रकाश पाटील (वय ३५ राहणार किरवली, तळोजा) याचा मृत्यू झाला. या अपघाता प्रकरणी अनोळखी कारचालका विरो-धात तळोजा पोलीस ठाण्यात एक डिसेंबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. किरवली येथील प्रमोद पाटील हा ३० नोव्हेंबर रोजी मोटरसायकल क्रमांक एम एच ४६ सी क्यू २३ ७३ या टीव्हीएस ज्युपिटर वरून मुंब्रा पनवेल हायवे वरून किरवली गावाच्या कमानीतून गावामध्ये जात होता. शिवम ट्रान्सपोर्ट ऑफिस समोर आला असता समोरून आलेल्या फोर व्हीलरने भरधाव वेगाने येऊन त्याच्या टीव्हीएस ज्युपिटरला धडक दिली. या अपघातात प्रमोद पाटील याच्या डोक्याला आणि छातीला गंभीर जखमा झाल्या. त्यानंतर कारचालक पळून गेला. अपघातात प्रमोद पाटील यांचा मृत्यू झाला.

# निवडणूक काळात बदला अन् सुडाची भाषा

**दै.रायगड नगरी । दिपक लोके**

**पेण ।** गेल्या महिनाभर पेण शहरात निवडणुकीचा जणु सुकाळ पडला होता. राजकीय पक्षाच्या रॅली कर्ककर्कश अऊलॉसिंग, चौक सभेतील आरोप प्रत्यारोपांच्या पायरी थंडी असली तरी वातावरण तापलेलेच विकास आणि निष्ठा या दोन मुद्द्यावर बाण झाडले गेले काही उमेदवारांनी संयम ठेवला तर काहींनी वैयक्तिक टीका बदला आणि सुडाची भाषा वापरत राजकारणाला चिकलफेक बनवले.

मतदानाचा हक्क बजावण्यासाठी मतदार उत्साह-ने बाहेर पडले नगराध्यक्ष पदाचे तीन तर नगरसेवक पदाचे उमेदवारांचे भवितव्य इ व्ही एम मध्ये बंद झाले मतमोजणी उशिरा होणार असल्याने उमेदवार आणि त्यांच्या कार्यकर्त्यांसह नातेवाईकांची बैचेनी शिगेला पोहोचली आहे यावेळी पेण शहराची निवडणूक कधी नव्हे इतकी चर्चेत राहिली समाज बैठका धक्कादायक माघारी तर मतदाराच्या आदल्या दिवशी मतदारांच्या हातात दिसलेली पाकिटे यामुळे लोकशाही नेमकी कुठे आहे हा सवाल अनुभवी राजकारणी अभ्यासक आणि नागरिकांच्या तोंडी आला गेल्या दहा दिवसात शहरातील हॉटेलांना मुबलक वाढ मिळाली उलट शाळा महाविद्यालयातील विद्यार्थी प्रचारात ओढले गेल्याने पालक वर्गात नाराजी उसळली.

येत्या काळात आपले वर्चस्व किती हे पडताळून पाहण्यासाठी झालेली ही निवडणूक उमेदवारांना अधिक प्रिय वाटली. पेण मधले प्रसिद्ध मंदिरे जिथे वर्षभर दर्शनालाही न जाणारे काही चेहरे प्रचाराच्या शुभारंभाला मंदिरात चमकताना दिसले तीन चाकी सायकल रचलेली गीते पोवाडे सतत वाजणारे स्पीकर दहा दिवस शहर दण-णून गेले पक्षाचे झेंडे बॅनर्स प्रकाश होता आणि सजलेली कार्यालय प्रचाराचा स्तर अक्षरशः शिगेला पोहोचला होता. २१ डिसेंबरला निकाल लागतील गुलाल उधळेल बँड वाजेल.

विजयी उमेदवार साजरा करतील परंतु पराजित उमेदवार कोणता धडा घेतील का हा खरा सवाल आहे. राजकारण हे वेगळी आणि पैशाच्या व्यवहारावर उभे न राहता प्रतिमा काम आणि लोकभिमुखतेवर उभे राहिले तरच लोकशाही मजबूत राहील मतदार हा एका दिवसासाठी राजा असतो राजा जेव्हा निर्णय देतो तेव्हा त्याला पैसे देऊन निर्णय बदलायला लावणाऱ्याचा भ्रमनिरास होतो.

राजकारण्यांनी पैशावर निवडणूक जिंकण्याच्या मोहातून बाहेर पडावे पराभव स्वीकारावा आपल्या भागात चांगले प्रतिमा उभी करावी आणि मग निवडणुकीला सामोरे जाण्याची हिंमत दाखवावी नाहीतर कुटुंब गाव आणि व्यवसाय यातच धन्यता मानावी पेणच्या नगरपरिषदेची निवडणूक संपली पण उरला तो एकच प्रश्न निवडणूक हा लोकशाहीचा उत्सव राहिला की बाजारवादाचा मेळा? उत्तर ठरवायचे ते जनतेने आणि पुढच्या पिढ्यांनी.

**वाचकांसाठी विनम्र सूचना**

'दै.रायगड नगरी' वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध प्रकारच्या जाहिरातीतील मजकुराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनासंदर्भात वा सेवेसंदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची 'दै.रायगड नगरी' वृत्तपत्र कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पूर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

# दुर्गवीर प्रतिष्ठान व ब्लॅक अ‍ॅण्ड वीच कंपनीकडून तळा येथील शाळांना स्मार्ट बोर्ड भेट

**दै.रायगड नगरी । संजय रिकामे**

**तळा ।** दुर्गवीर प्रतिष्ठान आणि ब्लॅक अ‍ॅण्ड वीच कंपनीच्या वतीने गो. म. वेदक विद्यामंदिर, ज्युनियर कॉलेज तसेच रायगड जिल्हा परिषद शाळा, तळा यांना अत्याधुनिक स्मार्ट बोर्ड भेट देण्यात आले. डिजिटल शिक्षणाच्या दिशेने टाकलेले हे महत्त्वपूर्ण पाऊल विद्यार्थ्यांसाठी मोठी शैक्षणिक उभारी ठरणार आहे.

या कार्यक्रमास तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष श्री. चंद्रकांत रोडे, सचिव श्री. मंगेश देशमुख, ब्लॅक अ‍ॅण्ड वीच कंपनीचे सीएसआर कॉर्डिनेटर श्री. वैभव चव्हाण, सीएसआर उपसमिती सदस्य श्री. योगेश उपाध्याय, श्री. अभिजित तापिसे, दुर्गवीर प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री. संतोष हसुरकर, उपाध्यक्ष श्री. रवींद्र रावराणे, सचिव श्री. सागर टक्के, रायगड जिल्हा प्रमुख श्री. रामजी कदम, सदस्य श्री. मंदार गावकर, श्री. विठ्ठल केंबळे, श्री. कृष्णराम धनवी, रा जि प शाळा समितीचे अध्यक्ष श्री भास्कर गोळे, गो म वेदक विद्यामंदिरचे मुख्याध्यापक श्री दिलीप ढाकणे, सौ जामकर मॅम आदी मान्यवर उपस्थित होते.



यावेळी दुर्गवीर प्रतिष्ठान व ब्लॅक ण्ड वीच कंपनीचे सर्व पदाधिकारी यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. सीएसआर कॉर्डिनेटर श्री. वैभव चव्हाण यांनी शिक्षक व विद्यार्थ्यांनी स्मार्ट बोर्डचा शैक्षणिक प्रगतीसाठी अधिकाधिक उपयोग करावा, असे आवाहन केले. दुर्गवीर प्रतिष्ठानचे अध्यक्ष संतोष हसुरकर, सचिव सागर टक्के, तसेच रामजी कदम यांनी किल्ले संरक्षण, संवर्धन आणि ग्रामीण-डोंगराळ भागातील शाळांना सतत सहकार्य करत असल्याचे सांगितले.

विद्यार्थिनी सई वावेकर हिने आपले मनोगत व्यक्त करून या सुविधेबद्दल कृतज्ञता व्यक्त केली, तर श्री. सुनील बैकर यांनीही आपल्या भावना व्यक्त केल्या.

सचिव मंगेश देशमुख यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी क्रिकेट जाळीची मागणी केल्यानंतर श्री. वैभव चव्हाण यांनी त्यासाठी सकारात्मक आश्वासन दिले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असलेल्या श्री. चंद्रकांत रोडे यांनी दुर्गवीर प्रतिष्ठान व ब्लॅक अ‍ॅण्ड वीच कंपनीचे मन:पूर्वक आभार मानले. श्री रोहीत भागवत व विद्यार्थ्यांनी स्वागतगीत सादर केले. कार्यक्रमाचे निवेदन श्री. सुहास वावेकर यांनी केले. यावेळी गो. म. वेदक विद्यामंदिर, ज्युनियर कॉलेज व रा जि प शाळेचे शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांची उत्स्फूर्त उपस्थिती लाभली.

**पनवेल महानगरपालिका**

**जाहीर सुचना**

**समाज विकास विभाग**

पनवेल महानगरपालिके मार्फत पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रातील वास्तव्य करणा-या महिलांचे सक्षमीकरण व जीवनमान उंचावण्याच्या दृष्टीकोनातून त्यांना स्वयंरोजगार गटासाठी खाली नमुद केलेल्या बाबीकरीता बाजारभाव दरपत्रके मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | वस्तूची नावे | नग | प्रति नग दर GST व करांसाहित | एकूण नग दर GST व करांसाहित |
|---|---|---|---|---|
| १ | घरघंटी (१ HP) | १५०० नग | | |
| २ | शिवणयंत्र | २२०० नग | | |
| ३ | मिरची कांडप | १२०० नग | | |

सदरची दरपत्रके दिनांक १२/१२/२०२५ रोजी दुपारी ०३.०० पर्यंत पनवेल महानगरपालिकेच्या समाज विकास विभागात येथे सादर करावी. विभागाचा पत्ता - उर्दु शाळा क्रमांक १०, तळ मजला, पनवेल

जा.क्र.प.म.पा/ सकवि / ५०/२०२५

दिनांक :-

सही /-
अतिरिक्त आयुक्त-II
पनवेल महानगरपालिका

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले. दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# माथेरानमध्ये प्रथम नागरिक होण्याचा मान कुणाला याबाबत चित्र अस्पष्टच



**दै.रायगड नगरी । मुकूंद रांजाणे**

**माथेरान ।** माथेरान नगरपरिषदेची मिनी विधानसभा निवडणूक समजल्या जाणाऱ्या ह्या निवडणुकीत स्थानिक राजकीय मंडळी तर दूरच परंतु तालुक्यातील नेत्यांसाठी एकप्रकारे प्रतिष्ठेचा विषय बनलेली असल्याने ज्याने त्याने आपापल्या परीने पूर्णपणे राजकीय शक्तीचा वापर करून वेळप्रसंगी मतदारांवर दबावतंत्र असावे यासाठी बाहेरील मनुष्यबळ मोठया प्रमाणावर आणण्यात आले होते.

एवढ्याशा या गावात जेमतेम चार हजार मतदार संख्येच्या ठिकाणी एकूण दहा प्रभागात कुठे तीनशे तर कुठे चारशे मतदार असणाऱ्या प्रभागात एक एक मत आपल्या पारड्यात पाडण्यासाठी इथल्या राजकीय इतिहासात पहिल्यांदाच प्रचंड प्रमाणात घोडेबाजाराला उधाण आल्याने ऐन मंदीच्या काळात नव्वद टक्के मतदारांनी दिवाळी साजरी केली. त्यामुळेच दोन्ही बाजूंनी मिळणाऱ्या आर्थिक लाभापायी मतदारांनी सुध्दा सर्वच उमेदवारांना समसमान मते विभागून दिल्याने कुणाच्या पारड्यात मतांचा साठा देण्यात आला आहे याबाबत सांगणे कठीण बनले आहे. ज्यांना उमेदवारी मिळाली नाही अशा कार्यकर्त्यांनी अपक्ष उमेदवार म्हणून निवडणूक लढवली आहे तर ज्यांना कधीही उमेदवारी मिळाली नाही अशा मंडळींनी हेतुपुरस्सर भलत्याच उमेदवाराला पाठिंबा देण्यासाठी पुढाकार घेतल्याचे दिसून आले आहे. मुळात ज्यांना आजतागायत उमेदवारी मिळत नाही त्यांना राजयोग तरी कुठून येणार त्यासाठी त्यांनी काही प्रभागात नेहमीप्रमाणेच नाहक खोडा घालण्यात धन्यता मानली गेली आहे. अपक्ष उमेदवारांमुळे कार्यक्षम उमेदवाराला कदाचित पराभवाला सामोरे जाण्याची वेळ येणार आहे.मतदारांनी सर्वच प्रभागातील उमेदवारांना समसमान मते दिल्याने सत्तेच्या चाव्या कुणाच्या हाती मिळणार आहेत आणि या गावाचा प्रथम नागरिक होण्याचा मान कुणाला मिळणार याबाबतचे चित्र अद्यापही अस्पष्टच दिसत आहे.

# ग्रामीण भागातील विद्यार्थी बालवैमानिक झाल्यास देशाची प्रगती झपाट्याने होईल : ना.आदिती तटकरे



**दै.रायगड नगरी । म्हसळा**

पंचायत समिती शिक्षण विभाग आणि आयडियल इंग्लिश स्कूल आणि जुनिअर कॉलेज म्हसळा यांच्या विद्यमाने २०२५-२६ चे ५३ वे तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन आयडियल इंग्लिश स्कूल म्हसळा येथे आयोजित करण्यात आले.

या विज्ञान प्रदर्शन उदघाटन प्रसंगी नाम. आदिती तटकरे यांनी बोलताना सांगितले कि,देशातील विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रात झपाट्याने बदल होत आह, भारतीय शात्रज्ञ् या क्षेत्रात विविध शोध लावून वैज्ञानिक दृष्टया आमुलाग्र बदल घडवून आणण्यात यशस्वी होत आहेत. तालुका स्तरीय विज्ञान प्रदर्शनाच्या माध्यमातून ग्रामिण भागातील बालवैज्ञानिकांना आपल्यातील सुप्त गुण सादर करण्यासाठी एक चांगली संधी उपलब्ध होते. अश्या प्रकारे मिळणाऱ्या संधीचा योग्य तो फायदा उठविल्यास विज्ञानाच्या दृष्टीकोनातून देशाची झपाट्याने प्रगती होण्यास वेळ लागणार नाही असे सांगून नाम. आदिती तटकरे यांनी भविष्यात तालुक्यात मध्यवर्ती ठिकाणी आणि सर्व शाळांना सोयीस्कर ठरेल अश्या दोन शाळांमध्ये लॅब ची निर्मिती करणार असल्याचे सांगून तालुक्यातील प्रत्येक विद्यार्थ्यांना स्क्रीन च्या माध्यमातून डिजिटल शिक्षण घेता येईल.

याप्रसंगी माजी सभापती तथा सचिव आयडियल इंग्लिश स्कूल, गटविकास अधिकारी माधव जाधव, निवासी नायब तहसीलदार डॉ. मृणाली शिरसाट, गटशिक्षणाधिकारी रमेश चव्हाण, पोलीस निरीक्षक रविंद्र पारखे, उपनगराध्यक्ष अनिकेत पानसरे, अनिल बसवत, प्रिन्सिपॉल बारी सर, माध्यमिक शिक्षक संघटना अध्यक्ष नितीन पाटील, अव्वल कारकून सलीम शहा, अंजुमन हायस्कूल प्राचार्य अ. रहमान घराडे, गणित विज्ञान मंडळ अध्यक्ष, सर्व केंद्र प्रमूख, विस्तार अधिकारी, मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रदर्शनात माध्यमिक विभागाचे एकूण १४, शिक्षकांचे ३, प्राथमिक विभागातून एकूण ३६, शिक्षकांचे ८ प्रयोग मांडण्यात आले असून एकूण ४५० विद्यार्थी सहभागी झाले आहेत.

## जाहीर नोटीस

के. गो. लिमये सार्वजनिक वाचनालय व ग्रंथालय, पनवेल हे धर्मादाय आयुक्तांचे अंतर्गत सामाजिक हेतूने विविध साहित्यिक उपक्रम चालवणारे वाचनालय आहे. महानगरपालिकेने वाचनालयाची इमारत धोकादायक असल्याचे कळविले आहे त्यानुसार या संस्थेच्या जीर्ण व धोकादायक झालेल्या इमारतीचे बांधकाम पाडण्यासाठी आवेदन पत्रक मागविण्यात येत आहेत. तरी स्वारस्य असलेल्या ठेकेदारांनी आपले आवेदन पत्र खालील पत्यावर सादर करावे यासाठी हे प्रसिद्धीपत्रक प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आलेली आवेदन पत्रे विचारात घेण्यात येतील. तसेच याबाबत आवेदन पत्र स्विकारणे अथवा नाकारण्याचा अंतिम अधिकार संस्थेच्या कार्यकारी मंडळाचा राहील याची नोंद घ्यावी. अधिक माहितीसाठी ग्रंथालयाशी संपर्क साधावा.

दिनांक ०६/१२/२०२५

**सही/-**

**उपाध्यक्ष**

**के.गो. लिमये सार्वजनिक वाचनालय व ग्रंथालय.**
**फायनल प्लॉट न. २४४ हुतात्मा हिरवे गुरुजी पथ**
**तालुका – पनवेल जिल्हा– रायगड.**
**मोबाईल नं. ९१३७८७७९८२**

# माथेरान मध्ये आंतरराष्ट्रीय जागतिक दिव्यांग दिन साजरा

**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरान गिरीस्थान नगरपरिषदेच्या वतीने आंतरराष्ट्रीय जागतिक दिव्यांग दिन साजरा करण्यात आला यावेळी अधीक्षक मा सुरेंद्र ठाकूर यांनी दिव्यांग बांधवांचे असलेले अधिकार व अस्तित्वात असणाऱ्या शासकीय योजनाबाबत मार्गदर्शन केले.तर मानवसेवा दिव्यांग सामाजिक संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत जाधव यांनी नगरपरिषदेच्या ५% मिळणारा राखीव निधीचा उपयोग करून दिव्यांग बांधवांनी स्वावलंबी व्हावे व भविष्यात एकही दिव्यांग शासकीय योजनापासून वंचित राहणार नाही यासाठी कार्यरत राहणार. यावेळी गुलाबपुष्प देऊन दिव्यांग बांधवांचा सन्मान करण्यात आला. तर मानवसेवा दिव्यांग सामाजिक संस्थेतर्फे अधीक्षक मा सुरेंद्र ठाकूर नगरपरिषदेचे सदानंद इंगळे यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला व खाऊ वाटप करून कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.याप्रसंगी नगरपरिषद कर्मचारी वृंद,शिक्षक वृंद संस्थेच्या सचिव शीतल कदम व संस्थेच्या मदतनीस नताशा मोरे तसेच दिव्यांग बांधव उपस्थित होते.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील वर्णनाची जमिन मिळकत आमच्या अशिलांनी कायमस्वरुपी विकत घेण्याचे ठरविले आहे. सदरच्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे:

**मौजे–खरोशी, ता. पेण, जि. रायगड येथील मिळकत**
**मिळकतीचे वर्णन**

| अ. क्रं. | कब्जेदार | गट नं. /हि.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| १ | मंजुळाबाई महादेव पाटील | २०९ | ०.१३.४० | ४.४४ |
| २ | अमरचंद महादेव पाटील | ब/१/ब | पो.ख. ०.१३.४० | |
| ३ | अविनाश महादेव पाटील | | एकूण ०.३०.१० | |
| ४ | अंजली रविकांत गावंड | | | |

सबब सदर मिळकतीवर अगर तिच्या कोणत्याही भागावर कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, पोटगी, चार्ज, संपादन, भाडेपट्टा, वहिवाट, साठेकरार, लिज तबदील, ट्रस्ट, वारसा या प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास संबंधितांनी आपापल्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून सात (७) दिवसांचे मुदतीत खालील सही करणार, ॲडव्होकेट यांचेकडे अगर खाली नमुद केलेल्या पत्यावर सकृतदर्शनी लेखी पुराव्यासहीत रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात. याप्रमाणे कोणाचीही कसलीही हरकत आली नाही तर सदर मिळकत निर्वेध आणि बोजारहित व खरेदी घेणेस योग्य आहे असे समजुन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व मागाहून येणाऱ्या तक्रारी अगर हरकती आमचे अशिलांवर कोणत्याही व कसल्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत व संबंधितांनी आपापल्या तथाकथित हरकती, तक्रारी कायमच्या सोडून दिल्या आहेत असे समजणेत येईल हे सर्व तमाम जनतेस कळावे.

दिनांक ०५/१२/२०२५

**सही/-**

**ॲड.अपेक्षा दामोदर पाटील**
**२२बी/१०, मोरया बंगलो, गणेश नगर,**
**नवीन रिस, ता. खालापूर जि. रायगड ४१०२२२**
**मो. नं. ७२७६४३७८३७**

# आयफोन १७ प्रो मोबाईलची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

महागड्या आयफोन १७ प्रो मोबाईलची चोरी झाल्याची घटना पळस्पे फाटा येथील एका कार्यालयात घडली आहे.

मोहम्मद सलीम मोहम्मद मोहित खान (वय ३६) याचा १ लाख ४९ हजार रुपये किमतीचा ॲपल कंपनीचा आयफोन १७ प्रो मोबाईल हा एस.के.टेंबर येथील शुभम पाटील याने सदर मोबाईल हा लबाडीचा इराद्याने चोरी केल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.


## पनवेल महानगरपालिका
### अग्निशमन विभाग
### दरपत्रके मागविण्यास सुचना

पनवेल महानगरपालिकेस सन २०२५-२६ या वित्तीय वर्षाकरीता निविदापत्रकांत नमूद केलेनुसार, पनवेल महानगरपालिकेच्या नविन पनवेल अग्निशमन केंद्रातील अग्निशमन वाहन क्र. MH 46 G 0054 आणि MH 46 G 0057 या वाहनांचे विमा नुतनीकरण करणेबाबत करणे करीता पात्र व इच्छुक संस्था / नोंदणीकृत पुरवठाधारक व प्रशिक्षितअसलेल्या संस्था यांच्या कडुन सदर कामी निविदा मागविण्यात येत आहेत. याकामी कोरे निविदा प्रपत्र व कामाची तपशिलवार माहिती www.panvelcorporation.com या दिनांक ०६/१२/२०२५ रोजी पासुन संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

जा.क्र./पमपा/अग्नि/ /प्र.क्र. / २२३६/२०२५
दिनांक :- ०५/१२/२०२५

**सही/-**
**(कैलास गावडे)**
**उपआयुक्त (मुख्यालय–I)**
**पनवेल महानगरपालिका**


## जाहीर नोटीस

या नोटीसद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, श्री. हरिशंकर महावीर गुप्ता राहणार प्लाट नं. बी-२२, सेक्टर-१२, कळंबोली, ता. पनवेल, जि. रायगड- ४१०२१८ यांची परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत माझे अशिल १) सौ. राणी धोंडीआप्पा देसाई २) कुमारी. प्राची धोंडीआप्पा देसाई राहणार रुम नं. १७, ओम शिवरचना को-ऑप हौसिंग सोसायटी लिमीटेड., प्लॉट नं. एफ- ४८, सेक्टर- १२, खारघर, नवी मुंबई, ता. पनवेल, जि. रायगड यांनी ॲग्रीमेंट फॉर सेल करुन विकत घेण्याचे ठरवलेले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**

**प्लॉट क्रमांक –सी–५०/३१+३२+३३, सेक्टर –१४, कळंबोली, ता. पनवेल, जि. रायगड, क्षेत्रफळ ११०.९४ चौ.मी. (ओपन प्लॉट)**

वर वर्णन केलेली मिळकत माझे अशिलांनी खरेदी करण्याचे ठरविले आहे. त्यासाठी सदर जाहिर नोटीस देण्यात येत आहे. सदर मिळकतीमध्ये कोणाचाही कोणताही मालकी हक्क, गहाण, दान, बक्षिसपत्र, लिन, लिज, पोटगी दावा, खरेदीखत इत्यादी कोणत्याही प्रकारचे हितसंबंध हक्क असल्यास हि नोटीस प्रसिध्द होताच हरकत नोंदवावी. सदर बाबत कोणासही कोणत्याही प्रकारची हरकत लेखी स्वरुपात कागदपत्रासह खालील सही करणार यांचेकडे ७ दिवसात खालील पत्त्यावर लेखी दाखल करावी. मुदतीनंतर येणा-या हरकतीचा विचार केला जाणार नाही. मुदतीत हरकत न घेतल्यास ज्यांचे हक्क आहेत ते स्वखुषीने सोडुन दिले आहेत असे समजले जाईल. मुदतीत हरकती आल्या नाहीत तर सदरची मिळकत निर्वेध आहे असे समजुन माझे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पुर्ण करतील यांची नोंद घ्यावी.

दिनांक ०६/१२/२०२५
ठिकाण : कळंबोली

**सही/-**

**ॲड. सुनिल एन. मोरे**
**ऑफीस नं. ३०६०, बिमा कॉम्पलेक्स,**
**सेक्टर के डब्ल्यु सी, कळंबोली ता. पनवेल,**
**जि. रायगड – ४१०२१८**
**मो. ८३६९४६५७९९**

## जाहीर नोटीस

आमचे अशिल, १. श्री. संदीप किसन काशीद २. श्री. प्रदिप किसन काशीद रा. पवई रोड गणेश नगर झोपडपटटी, पार्क साइट, विक्रोळी (पश्चिम), मुंबई: ४०००७९ यांचे व्दारे सर्व लोकांस या जाहीर नोटीशीव्दारे कळविण्यात येत आहे की खालील वर्णन केलेली मिळकत ही विदयमान मालक श्री. वनवीर भोजा राजपुत रा. सी-४२/एस-९, अमरज्योती सी एच एस लि., एम जी कॉम्प्लेक्स जवळ, सेक्टर नं. १४ वाशी, नवी मुंबई: ४००७०३, यांचे कडून कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजें नवीन पनवेल (पूर्व), ता. पनवेल जि. रायगड.**
**युनीट नं. १० प्लॉट नं. B–४४ सिदधी गणेश को. ऑप. हौ. सो. लि.**
**सेक्टर नं.: ०६, क्षेत्रफळ : ३२.०० चौ. मीटर. बील्ट अप**

वरील वर्णनाच्या मिळकतीबाबत इतर कोणत्याही इसमाचा अगर संस्थेच्या साठेकरार विकी, गहाण, दान, लिज, बक्षिसपत्र, चार्ज, फरोक्त, दावा, वारसाहक्क, लायसन्सी, लिन, टेनन्सी, विल, मृत्युपत्र, अन्नवस्त्र, पोटगी, ताबा कब्जा, हवाला, अदला बदल अथवा कोणत्याही प्रकारचा हक्क हीतसंबंध असल्यास कींवा त्याच्या खरेदीखताच्या व्यवहरास हरकत असल्यास संबधची व्यती किंवा संस्थानी आपली हरकत पूराव्यासह लेखी स्वरुपात पोस्टाने किंवा स्वताःहून हजर होउन आमचे कडे ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसात कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हीतसंबध नाही. किंवा असल्यास तो हक्क हीतसंबध त्यांनी आमचा अशीलांच्या लाभात सोडून दिला असून त्याची आमच्या आशिलांच्या लाभात होणाऱ्या खरेदीखतास कोणतीही हरकत नाही असे समजण्यास येऊन खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करण्यात येईल. त्यानंतर मागाहून कोणत्याही हरकत घेतल्यास ती हरकत आमच्या आशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची नोंद घ्यावी.

दिनांक ०६/१२/२०२५
ठिकाण : पनवेल

**सही/-**

**ॲड.उदय प्रकाश मोकल**
**मु. पो. चिरनेर ता. उरण जि. रायगड,**
**पीन कोड: ४१०२०६**
**मोब. ९०८२९११९१३**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते कि, खालील परिशिष्टात नमूद केलेली मिळकत नारायण जानू शिवकर व इतर खरेदी मालकी हक्क व कब्जेवहिवाटीचे असून आमचे अशिलांसोबत खालील नमूद मिळकत ही विक्री करणेकामी बोलणी चालू असून तत्पूर्वी कोणाची काही तक्रार, हरकत असल्यास ती समजणेकामी सदर नोटीस देणेत येत आहे.

खालील परिशिष्टात मिळकत पूर्णतः निर्वेध, निजोखमी, निष्कर्जी व बोजारहित असून विद्यमान मालकास खालील परिशिष्टातील मिळकतीचे पूर्ण पणन योग्य हक्क व अधिकार आहे. असा भरवसा व खात्री विद्यमान मालकाने आमचे अशिलास दिलेली आहे. तथापि, सदरील मिळकतीवर विद्यमान मालकाचे व्यतिरिक्त अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा गहाण, दान, लीन, पोटगी, अन्न, वस्त्र, कोर्टवाद, चार्ज, वाटप, दावा, वारसाहक्क, मृत्यूपत्र, वहिवाट, अदलाबदल, करार, खरेदीखत, मुखत्यारपत्र, विरोधी कब्जा अगर तत्सम कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, हितसंबंध वगैरे असल्यास सबंधितांनी सदरील नोटीस प्रसिद्ध झालेपासून ०७ दिवसांचे आत मूळ कागदपत्रांनिशी आमचे खालील पत्त्यावर येऊन खात्री द्यावी. सदर मुदतीमध्ये हरकत न आल्यास खालील परिशिष्टातील मिळकत पूर्णतः निर्वेध, निजोखमी, निष्कर्जी व बोजारहित असून विद्यमान मालकास खालील परिशिष्टातील मिळकतीचे पूर्ण पणन योग्य हक्क व अधिकार आहे. कोणाचेही कोणत्याही प्रकारचा काही एक, अधिकार व हितसंबंध नाही. असल्यास तो त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिलेला आहे. असे समजून आमचे अशील ठरलेप्रमाणे पुढील व्यवहार पूर्ण करतील. मुदतबाह्य हरकत विचारात घेतली जाणार नाही.

परिशिष्ट :- तुकडी रायगड, पोटतुकडी तालुका उरण, मे. दुय्यम निबंधक, उरण, रायगड, जिल्हा. रायगड तसेच जिल्हा परिषद रायगड, हद्दीतील मौजे पुनाडे, येथील मिळकत भूमापन /सर्व्हे नं. १३१/११४ यांसी एकूण क्षेत्र ०.८२.५० (हे.आर.प्र.) व पोटखराबा ०.१२.१० (हे.आर.प्र.), आकार रक्कम रुपये ५.१२ पैसे. यांसी चतु:सीमा वहिवाटीप्रमाणे आहेत.

येणेप्रमाणे वर्णनात्मक जमीन, जोडहक्क, अधिकार व हितसंबंधासहित दरोबस्त.

रायगड, तारीख ६ डिसेंबर २०२५

**सही/-**

**श्री. विनायक र. ताम्हणकर, वकिल**
**खरेदीदारातर्फे वकिल**
**३०२, जय आशापुरा रेसिडन्सी, शनी नगर,**
**मांजर्ली, बदलापूर (प.) ४२१५०३,**
**भ्रमणध्वनी क्र. ८६६८५५१३१२**

ॲड.कोठलीकर साहेब

ॲड.प्रदीप भोईर

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.जिल्हा व सत्र न्यायाधिश रायगड सो.यांचे न्यायालयांत
दिवाणी चौकशी अर्ज क्र.३१/२०२५
नि.नं.१३/ड
ने. ता. १९/१२/२०२५

१) श्रीमती हेमांगी गिरीधर घरत
वय. ४० वर्षे, धंदा. गृहीणी
२) श्रीयान गिरीधर घरत
वय, ४ वर्षे, धंदा. शिक्षण
सर्व मु.फ्लॅट नं. ९१, नववा मजला,
सी विंग, बिल्डींग नं. १, कल्पतरू रिव्हर साईड,
पंचमुखी मारूती मंदीराजवळ, तक्का,
पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड. ४१०२०६
अर्जदार क्र. १ स्वतः करता व अर्जदार
क्र. २ यांची अज्ञान पालनकर्ती म्हणून ... अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही ... सामनेवाला

तमाम जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, अर्जदार क्र. १ हिचे पती व अर्जदार क्र. २ यांचे वडील कै. गिरीधर रमाकांत घरत हे दिनांक ०५.०१. २०२१ रोजी मयत झाले आहेत. कै. गिरीधर रमाकांत घरत यांचे पश्चांत अर्जदार यांचे सामाईक मालकीची मौजे उलवे, ता. पनवेल, जि. रायगड येथे प्लॉट नं १७३, सेक्टर नं. १७ क्षेत्र १०४९.९४ चौरस मिटर या क्षेत्राचे मिळकती संदर्भात अर्जदार यांनी दि गार्डीयन्स ॲन्ड वॉर्डस ॲक्ट, १८९० चे कलम ७ व २९ प्रमाणे अर्जदार क्र. २ यांची अज्ञान पालनकर्ता म्हणून अर्जदार क्र. १ यांची नेमणूक करून मिळणेकरीता व संदर्भित मिळकत अर्जदार क्र. २ यांचेवतीने विक्री करण्याची परवानगी मिळणेकरीता या मे. न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. सबब, अर्जदार क्र. २ यांची अर्जदार क्र. १ ही अज्ञान पालनकर्ती व त्यांचेवतीने संदर्भित मिळकत विक्री करण्यास परवानगी देणेस कोणाचीही कसलीही हरकत असल्यास सदरची हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत में न्यायालयात दाखल करावी. विहित मुदतीनंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही व अर्जदार यांचे लाभात दाखला प्रदान करण्यात येईल, हे सर्व कळावे.

ही नोटीस आज दि.०३/१२/२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्याने दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**जिल्हा न्याया., रायगड**
**पनवेल–रायगड**

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**जिल्हा न्याया., रायगड**
**पनवेल–रायगड**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील वर्णनाची जमिन मिळकत आमच्या अशिलांनी कायमस्वरुपी विकत घेण्याचे ठरविले आहे. सदरच्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे:

**मौजे–खरोशी, ता. पेण, जि. रायगड येथील मिळकत**
**मिळकतीचे वर्णन**

| कब्जेदार | गट नं. /हि.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | पो.ख. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| एकनाथ जोमा पाटील<br>कुसुम बाळाराम मढवी<br>चंद्रकांत जोमा पाटील<br>चंद्रभागा वसंत घरत<br>ज्योती जगन्नाथ गावंड<br>पंढरीनाथ बाळाराम गावंड<br>प्रज्ञा जगन्नाथ गावंड<br>प्रविण वामन पाटील<br>प्रशांत वामन पाटील<br>भरत बाळाराम गावंड<br>मंजुळा बाबुराव पाटील<br>मनिषा वामन पाटील<br>यमुना वामन डंगर<br>निता सुरेश गावंड<br>विजया सखाराम म्हात्रे<br>विमल देवजी म्हात्रे<br>विलास बाळाराम गावंड<br>शंकर बाळाराम गावंड | ६५ | ०.७१.०० | ०.०३.०० | १.३१ |

सबब सदर मिळकतीवर अगर तिच्या कोणत्याही भागावर कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, पोटगी, चार्ज, संपादन, भाडेपट्टा, वहिवाट, साठेकरार, लिज तबदील, ट्रस्ट, वारसा या प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास संबंधितांनी आपापल्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून सात (७) दिवसांचे मुदतीत खालील सही करणार, ॲडव्होकेट यांचेकडे अगर खाली नमुद केलेल्या पत्यावर सकृतदर्शनी लेखी पुराव्यासहीत रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात. याप्रमाणे कोणाचीही कसलीही हरकत आली नाही तर सदर मिळकत निर्वेध आणि बोजारहित व खरेदी घेणेस योग्य आहे असे समजुन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व मागाहून येणाऱ्या तक्रारी अगर हरकती आमचे अशिलांवर कोणत्याही व कसल्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत व संबंधितांनी आपापल्या तथाकथित हरकती, तक्रारी कायमच्या सोडून दिल्या आहेत असे समजणेत येईल हे सर्व तमाम जनतेस कळावे.

दिनांक ०५/१२/२०२५

**सही/-**

**ॲड.अपेक्षा दामोदर पाटील**
**५०७, पाचवा मजला, सेक्टर १७, खांदा**
**कॉलनी, भुमीलँड मार्क, किया शोरुमच्यावर**
**मो. नं. ७२७६४३७८३७**

### प्लॅटफॉर्म – उंच इमारतींमधील आग व आपत्ती नियंत्रणासाठी मोठे पाऊल

# पनवेल महानगरपालिका घेणार नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी ५५ मीटर व २८ मीटर अत्याधुनिक एरियल लॅडर

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल शहरात गेल्या काही वर्षांत वेगाने वाढ होत असून, लोकसंख्या, गृहनिर्माण प्रकल्प, व्यापारी संकुले, मॉल्स, रुग्णालये, हॉटेल्स तसेच उद्योगक्षेत्र यामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. यासोबतच उंच इमारती, हाई-राईज रेसिडेन्शियल टॉवर्स, कार्यालयीन संकुले मोठ्या प्रमाणावर उभी राहत आहेत. या पार्श्वभूमीवर आगीच्या घटना व इतर आपत्कालीन परिस्थितीत त्वरित आणि प्रभावी प्रतिसाद देणे आवश्यक आहे. ही गरज लक्षात घेऊन आयुक्त मंगेश चितळे यांच्या सूचनेनुसार पनवेल महानगरपालिकेने ५५ मीटर व २८ मीटर उंचीपर्यंत कार्यक्षम अशा अत्याधुनिक एरियल लॅडर प्लॅटफॉर्म वाहनांची खरेदी करण्याचा महत्त्वपूर्ण



निर्णय घेतला आहे.

सद्यस्थितीत पनवेल महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाकडे उपलब्ध अस-लेली साधनसामग्री मर्यादित असून, विशेषतः उंच इमारतींमध्ये आग लागल्यास किंवा अडकलेल्या व्यक्तींना वाचवायचे असल्यास आवश्यक त्या उंचीपर्यंत पोहोचण्याकरिता आधुनिक एरियल लॅडर प्लॅटफॉर्मची आवश्यकता होती.

५५ मीटर एरियल लॅडर प्लॅटफॉर्म हे उंच इमारतींमध्ये (१५ ते २० मजले व त्यापेक्षा जास्त) पोहोचण्यासाठी उपयोगी ठरेल, तर २८ मीटर एरियल लॅडर प्लॅटफॉर्म मध्यम उंचीच्या इमारती, गृहनिर्माण संकुले, रुग्णालये, शाळा, हॉटेल्स आदी ठिकाणी बचावकार्यासाठी उपयुक्त ठरेल. या खरेदी प्रक्रियेसाठी निविदा मागवण्यात आल्या असून, तांत्रिक निकषांनुसार पात्र कंपन्यांकडून प्रस्ताव प्राप्त झाले आहेत. त्यानुसार आवश्यक तांत्रिक वैशिष्ट्ये, सुरक्षितता मानके, कार्यक्षमता व दीर्घकालीन देखभाल खर्च यांची सखोल तपासणी करून योग्य तो प्रस्ताव निवडण्यात येणार आहे. या संपूर्ण प्रकल्पावर सुमारे २२ कोटींहून अधिक खर्च (जीएसटीसह) येणार असून, ही गुंतवणूक शहराच्या सुरक्षिततेसाठी अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे. या माध्यमातून पनवेल महानगरपालिकेचा अग्निशमन विभाग अधिक सक्षम, आधुनिक आणि सुसज्ज होणार आहे. महानगरपालिकेच्या या निर्णयामुळे नागरिकांना अधिक सुरक्षित वातावरण मिळेल, तसेच भविष्यातील वाढत्या लोकसंख्या व उंच इमारतींशी संबंधित आव्हानांना सामोरे जाण्यासाठी प्रशासन सज्ज राहील.

> नागरिकांचे प्राण व मालमत्तेचे संरक्षण हीच महापालिकेची सर्वोच्च जबाबदारी असून, त्या दृष्टीने पनवेल महानगरपालिका सातत्याने आधुनिक सुविधा उभारण्याचा प्रयत्न करत आहे. ५५ मीटर व २८ मीटर एरियल लॅडर प्लॅटफॉर्मची खरेदी हा त्याचाच एक महत्त्वाचा भाग आहे.
>
> **– मंगेश चितळे, आयुक्त तथा प्रशासक, पनवेल महानगरपालिका**

# कालवा सफाईच्या नावे पाटबंधारे विभागाकडूनच माणगांवमध्ये आजवर असंख्य वृक्षांची कत्तल

**दै.रायगड नगरी । रवींद्र कुवसेकर**

**उतेखोल/माणगाव ।** माणगांवात आता एकमेव शिल्लक असलेला हरित पट्टा म्हणेज शहराच्या मध्यभागी असलेला कालव्याचा परिसर, आजपर्यंत माणगाव नगर पंचायत मार्फत देखील कोणतेही पर्यावरणपूरक धोरण न राखता कधीही शहरातल्या वृक्षांची नोंद किंवा टिप्पणी करून कोणत्याही प्रकारचे सर्वेक्षण येथे झालेले नाही.

साधारणतः उन्हाळी कालवा सोडण्याच्या पूर्वी डिसेंबर-जानेवारी महिन्यात कालवा साफसफाईचा उपक्रम शासनाकडून हाती घेतला जातो, टेंडर काढून लाखो-करोडो रुपये खर्च केले जातात, कालव्याच्या नावे अर्थपूर्ण अर्थकारण सुरु असल्याचे आजवर चित्र आहे पण कालवा साफसफाई म्हणजे काय तर कालव्याच्या आजूबाजूची सगळी नैसर्गिक रित्या उगवलेली झाडे तोडली जातात. असंख्य झाडे यांत्रिकी दृष्ट्या सध्या तोडली जात आहेत, यंत्रामुळेच ओरबाडून कालव्याच्या बांधाचे देखील नुकसान होत आहे, साधारण एक-दोन दिवस ते जास्तीत जास्त सात दिवस हा साफसफाईचा कार्यक्रम यांत्रिकी दृष्ट्या येथे चालतो सर्व आजूबाजूच्या झाडांची कत्तल येथे पद्धतशीरपणे होते.

कालवा परिसरात संपूर्ण झाडे नैसर्गिकरित्या उगवतात येथे कोणतेही वृक्षारोपण करावे लागत नाही, परंतु गेल्या काही वर्षांमध्ये पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांकडून आणि टेंडर मिळवलेल्या सफाई करणाऱ्या ठेकेदाराकडून कडून विनाकारण, पिंपळ, उंबर, वड आणि इतर मोठ्या झाडांची देखील कत्तल केली गेल्याचे निदर्शनास येते. त्यामुळे अनावश्यक रानमोडी सारखे तण(विड) वाढून, परिसरातील जैवविवीधता आता धोक्यात आली आहे, देशी स्थानिक झाडे ओळखून कालव्याच्या किनारून त्यांना वाढून दिल्यास येथे कोणत्याही प्रकारचे खर्चिक वृक्षारोपण करण्याची देखील गरज नाही परंतु वृक्षारोपण करू शकलो तर माणगावच्या मधोमध अगदी एक खूप सुंदर असे स्वयंपूर्ण कालवा उद्यान तयार होऊ शकते असे माणगांवचे पर्यावरण अभ्यासक शंतनु कुवेसकर यांनी सांगितले आहे.

बाहेरील देशांमधील कालवे पहा तेथे लोक त्यांच्या कालव्यामध्ये बोटिंग, कायाकिंग करतात त्यांच्या कालव्यांमध्ये विविध प्रकारच्या जलक्रीडा सदृश्य क्रियाकलाप करतात, शुद्ध पाण्याचे कालवे त्यांच्याकडे आहेत. आपल्याकडे हे शुद्ध पाण्याचे कालवे बनवण्यासाठी भाला मोठा खर्च करून गोष्टी कराव्या लागलेल्या आहेत, त्या जोपासण्याची आपल्याला खरी गरज आहे, माणगांव तालुक्यात काही गावांमध्ये तर पिण्याच्या पाण्यासाठी देखील कालव्याच्या पाण्याचा वापर तसेच प्रसंगी माणगांव शहरातदेखील काळनदीची पाण्याची पातळी कमी झाली कि नदीत कालव्याचे पाणी सोडले जाते, पण शहरामधून आपलीच माणसं त्यामध्ये कचरा करत आहेत. आपल्या कालव्याची दुर्दशा आपणच लावत आहोत, याकडे दुर्लक्ष करून लोकप्रतिनिधीमात्र मूक गिळून गप्प आहेत. कोट्यवधींची पाणी पुरवठा योजना सध्या माणगांवात सुरु आहे, पण पाणीच शुद्ध नसेल तर हि योजना कुचकामी असल्याचे नागरीक बोलत आहेत.



## सुडकोली-महान फाटा पूल धोक्यात; एसटी बंद-जनता त्रस्त

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

अलिबाग-रोहा मार्गावरील सुडकोली पुल आणि रामराज नदीवरील महान फाट्याचा पूल हे आता अक्षरशः धोकादायक अवस्थेत ढासळण्याच्या मार्गावर आहेत. रस्त्याची तर इतकी दयनीय अवस्था आहे की खड्डे आणि रस्ता यात फरकच उरलेला नाही. या जीवघेण्या निष्काळजीपणामुळे वाहतूक बंद करण्यात आली असून, त्याचा सर्वात मोठा फटका नागरिकांना बसला आहे.

एस.टी. सेवा बंद झाल्याने विद्यार्थी, महिला, कामगार सगळ्यांचेच जगणे अवघड झाले आहे.

या भीषण परिस्थितीचा जाब मागण्यासाठी आज सार्वजनिक बांधकाम विभाग, अलिबाग यांना निवेदन देण्यात आले. सुडकोली व महान फाट्यावरील पूलांची तात्काळ दुरुस्ती, पर्यायी मार्गाची निर्मिती आणि एस.टी. सेवा तत्काळ पूर्ववत करण्याची मागणी करण्यात आली. या बाबत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंता श्रीमती एम. एम. धायतडक यांनी ८ दिवसांत कार्यवाहीचे आश्वासन दिले आहे.

अलिबाग-रोहा मार्ग हा जनजीवनाशी निगडित महत्त्वाचा रस्ता. पण आज त्याची अवस्था पाहून एकच प्रश्न उभा राहतो, लोकांचा जीव मोलाचा आहे का, की कागदपत्रे आणि निविदाच जास्त महत्त्वाच्या?, सुडकोली पुल-ावर पोकळी, तडे, लोखंडी शिगा बाहेरत्यामुळे प्रवास करणाऱ्या नागरिकाचा जीव धोक्यात आला आहे. महान फाट्याचा पूल इतका जीर्ण की वाहतूक करणे म्हणजे थेट मृत्यूला आमंत्रणच आहे.तसेच रस्त्यावर खड्डे की रस्ता खड्ड्यात-हेच ओळखू न येण्याइतकी दुर्दशा!झाली आहे.

या सर्वांमुळे एस.टी. सेवा बंद झाली आणि प्रशासनाला वाटलं की समस्या सुटली पण प्रत्यक्षात जनतेची कोंडी, विद्यार्थ्यांचे शिक्षण, कामगारांची रोजीरोटी आणि महिलांचे सुरक्षित प्रवासाचे हक्क सगळंच उध्वस्त झाल आहे! निवेदनकर्त्यांनी स्पष्ट सांगितले आहे की ८ दिवसांत रस्ते-पूल दुरुस्त करा, पर्यायी मार्ग द्या, एस.टी. सेवा सुरू करा-नाहीतर तीव्र आंदोलन अनिवार्य!असे स्पष्ट निवेदनात दिले आहे.

# पुष्पक नगरसाठी एनएमएमटी बस सेवा लवकरच सुरु होणार

### दिशा बहुउद्देशीय सेवा संस्थेचे निवदेन, मंत्री गणेश नाईक सकारात्मक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ बाधितांसाठी देण्यात आलेल्या भूखंडावर पुष्पक नगर ही नवी वसाहत तयार होत आहे. पुष्पक नगर हे नियोजित शहर आकार घेत असताना या ठिकाणी नागरिकांना समस्या भेडसावत आहे ती सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेची. विमानतळा नजीक असलेल्या शहराचे भविष्य उज्ज्वल आहे. त्यामुळे भविष्यात येथील नागरिकीकरण झपाटयाने वाढणार आहे.

त्यामुळे येथे एमएमएमटीची बससेवा सुरु करण्यासाठी दिशा बहुउद्देशीय सेवा संस्थेमार्फत एनएमएमटी बस सेवा पुष्पक नगरसाठी सुरु करावी असे निवेदन संस्थेचे अध्यक्ष सुनिल कटेकर यांनी मंत्री गणेश नाईक यांच्या जनता दरबारात दिले. ते वाचल्यावर लगेचच त्यावर सकारात्मक भूमिका घेत त्यांनी येथे उपस्थित असलेल्या एनएमएमटीच्या पदाधिकार्यांना त्यावर तातडीने कारवाई करण्याचे आदेश दिले.

यावेळी एनएमएटीचे अधिकार्यांनीही यावेळी सकारात्मक प्रतिसाद लवकरच याबाबत पाऊले उचलण्याचे आश्वासित केले. नवी मुंबई महानगरपालिका अंतर्गत सुरु असलेल्या एनएमएमटीच्या बससेवेचा लाभ बहुसंख्य पनवेलकरांना होत आहे. ही सेवा पनवेलकरांसाठी अत्यंत उपयुक्त ठरत आहे. दापोली, श्रीरामनगर परिसरात आंतरराष्ट्रीय विमानतळ बाधितांना विमानतळ प्राधिकरण पुष्पकनगर नोड विकसित करीत आहे. येथील नागरिकीकरण झपाटयाने वाढणार आहे. मात्र या ठिकाणाहून रहिवाशांना येण्याजाण्यासाठी कोणतीही सार्वजनिक सेवा उपलब्ध नसल्याने या ठिकाणी वास्तव्यास असलेल्या नागरिकांना नाहक भूर्दंड पडत आहे.

तसेच या ठिकाणी भविष्यात येवू पाहणार्या रहिवासीही या ठिकाणी सार्वजनिक वाहतूक सेवा नसल्याने फारसे उत्सुक दिसत नाहीत. तरी आपण या नागरिकांना भेडसावणार्या प्रश्नाचा विचार करुन एनएमएमटी बस पनवेल, वडघर, करंजाडे, वरचे ओवळे,



कॉलेज फाटा, टी पॉईंट, दापोली, श्रीराम नगर, मानघर, दापोली मार्गे पुष्पक नगर तसेच खांदेश्वर रेल्वे स्थानक, टी पॉईंट, दाप-ोली, श्रीराम नगर, मानघर, कुंडेवहाळ, सेक्टर ३ तसेच बेलापूर, विमानतळ, वहाळ, गव्हाण फाटा, कुंडेवहाळ, श्रीराम नगर, मानघर, दापोली पुष्पकनगर अशा मार्गावर एनएमएटी सेवा सुरु करावी अशी मागणी दिशा बहुउद्देशीय संस्थेतर्फे करण्यात आली.

